REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331 (UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# यशवंतराव होळकर व इंग्रजविरोधी संघ : एक वास्तविकता



**कु. अश्विनी एस. अतकरी**
**शोधकर्ती , भंडारा.**

**सारांश :**

पेशवा बाजीराव दुसर याने इंग्रजांशी वसईचा तह केल्याची वार्ता कळताच, " टिपू सुलतानाप्रमाणेच आता इंग्रज मराठा सत्तेचा नाश करतील अशी प्रतिक्रिया यशवंतराव होळकराने दिली" अशी प्रतिक्रिया देऊनच यशवंतराव थांबले नाही, तर त्यांनी इंग्रजांच्या विरोधात मराठा सरदारांशी तसेच हिंदुस्थानातील विभिन्न राजे व संस्थानिकांशी मिळून एक प्रबळ संघ निर्माण करण्याचे प्रयत्न सुरु केले. नागपूरकर भोसलेंच्या माध्यमातून दौलतराव शिंदेशीही सख्य करण्याचा तसेच दौलतराव व नागपुकर भोसले यांचेशी मिळून इंग्रजांचा एकत्रीतपणे प्रतिकार करण्याच्या हालचाली सुरु केल्या.

या व्यतिरिक्त यशवंतरावांनी राजपूत राजे व संस्थानिक तसेच नेपाळ आणि अफगाणिस्तानच्या शासकांचीही मदत प्राप्त करण्याचा प्रयत्न केला. त्या प्रयत्नांना यशही येऊ लागले होते. लवकरच इंग्रज विरोधी प्रबळ संघ निर्माण होण्याची चिन्हेही दिसू लागली. दुसऱ्या इंग्रज मराठा युद्धात पराभूत झाल्यानंतरही शिंदे व भोसले यांनी इंग्रजांच्या विरोधात यशवंतरावांशी सहकार्य करण्याचे मान्य केले. भरतपूरच्या व जोधपुरच्या शासकांनीही इंग्रजांच्या विरोधात संघर्ष सुरु केला. पण इंग्रजांनी कुटनीतीचा वापर करून दौलतरावाला तसेच भरतपुरचा शासक रणजित सिंह याला यशवंतरावांपासून दूर केले. त्यामुळे निकराचे प्रयत्न करूनही इंग्रजांच्या विरोधात प्रबळ संघ अस्तित्वात येऊन इंग्रजांचा पराभव करणे शक्य झाले नाही. तरीही यशवंतरावांनी त्यांच्या मृत्यूपर्यंत इंग्रजांशी लढण्याचे प्रामाणिक प्रयत्न केले. या यशवंतरावांच्या प्रयत्नांची, कार्याची व इंग्रज विरोधी संघ निर्माण करण्यात आलेल्या अपयशांची मीमांसा केली जावी व त्याबाबतची वास्तविक स्थिती कळावी याकरिता सदर शोध प्रबंध सादर आहे.

**विवरण :**

बाजीरावाने वसईला इंग्रजांच्या आश्रयाला जाऊन ३१ डिसेंबर १८०२ रोजी तैनाती फौज पद्धती स्विकारण्याचा तह केला. वास्तविकत: हडपसरच्या युद्धानंतर बाजीराव इंग्रजांच्या मदतीकरिता जाणार असल्याचे दिसून येताच यशवंतराव होळकरांना तसेच दौलतराव शिंदे व नागपूरकर भोसले यांना मराठा राज्यावर इंग्रज आघात करणार याची जाणीव झाली होती. वसईचा तह झाल्याची वार्ता कळताच याच सरदारांनी इंग्रजांच्या संभाव्य आक्रमणाचा प्रतिकार करण्याच्या दृष्टीने हालचाली सुरु केल्या. हे करत असतांनाच सर्व मराठा सरदारांनी एकत्र येऊन संघटीत प्रतिकार केल्याशिवाय मराठा राज्याचे अस्तित्व टिकणार नाही, या जाणीवेतून परस्परांमधील सर्व मतभेद विसरून एकत्र येण्याच्या दृष्टीने पावले उचललीत. इतकेच नव्हे तर हिंदुस्थानातील इंग्रज विरोधकांच्या मदतीने इंग्रज विरोधी संघ निर्माण करणे अधिक हितावह ठरणारे असल्याची जाणीव त्यांना झाली. या दृष्टीने हालचालीही सुरु केल्या गेल्या.

इंग्रज विरोधी संघ निर्माण करण्याची मुळ कल्पना यशवंतराव होळकरांची होती. असे मत सरदेसाई यांनी व्यक्त केले आहे. ते म्हणतात " कर्नल क्लोजच्या धमकीवजा पत्रानंतर यशवंतराव होळकर पुण्याहून माघारी गेला असला तरी इंग्रजांचा प्रतिकार करण्यासाठी इंग्रज विरुद्ध संघ निर्माण करण्याच्या दृष्टीने त्याने पाऊले उचललीत. यासाठीच त्यांनी बाबा फडके याला हैद्राबादला निजामाकडे तर श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव यांना प्रतिनिधी म्हणून नागपूरला

पाठविले. निजाम व नागपूरकर भोसल्यांच्या मदतीने संयुक्तरित्या इंग्रजांचा प्रतिकार करण्याचा उद्देश यशवंतराव होळकरांचा असल्याचे दिसते."[१]

कानुनगो यांनीही इंग्रज विरोधी संघ उभारण्याची कल्पना यशवंतरावांचीच होती. असे मत व्यक्त केले आहे. ते म्हणतात " २ जानेवारी १८०३ रोजी यशवंतरावांनी अमृतराव व इतरांना याविषयी कळविले होते या पत्रावरूनच पेशवा व शिंदे यांचेशीही यशवंतराव समेट करू इच्छित होता असेही दिसते."[२]

तसेच या. मा. काळे लिहितात " दौलतराव शिंदे व रघुजी भोसले यांना वसईच्या तहाची व पुण्यास इंग्रज सैन्य आल्याची बातमी समजताच त्यांना इंग्रजांचा व बाजीरावाचा मनस्वी राग आला. मराठी राज्याची इतिश्री जवळ आली. हे भविष्य समजले. शिंदे, भोसले, होळकर व इतर मराठे संस्थानिक एक होऊन जोराचा प्रयत्न करून मराठेशाही इंग्रजांच्या घशातून सोडवावी म्हणून त्यांनी अखेरचा निकराचा प्रयत्न करण्याचा निश्चय केला... यशवंतराव होळकरांना वळविण्याचे काम दौलतरावाने राघुजीस सांगितले होते. त्याचप्रमाणे राघुजीने यशवंतरावांसही येऊन मिळण्याबद्दल पत्र पाठविली. होळकरांच्या मिळण्यावर सर्व गोष्टी अवलंबून होत्या."[३]

सरदेसाई यांनीही माननीय या. मा. काळे यांच्या सारखेच मत व्यक्त केले आहे. ते लिहितात " शिंदे, भोसले यांनाही यशवंतरावां प्रमाणेच इंग्रजांमुळे निर्माण झालेल्या संकटांची जाणीव झाल्यामुळे इंग्रजांना संयुक्तपणे तोंड देता यावा म्हणून त्यांनीही परस्पर वाटाघाटीही सुरु केल्या होत्या.[४] १५ जून १८०३ रोजी यशवंतराव होळकरास लिहिलेल्या पत्रात रघुजी भोसले लिहितात " इंग्रजांकडील व नावाबाकडील कैसा प्रकार नमूद जाला आसे त्यात आपसातील बखेड्यामुळे स्वराज्यास आपाये करावयाचे दुरदेसी तुमचे जागा आहेच व खमीर येविसीचा पका आहे हे येथीलही खातरजमा पूर्ती आहेच. सारांश त्रिवर्गाचा एक विच्यार टहरून पुढील मसलतीचा नकाशा जरूर व्हावा हे उटकठा रात्रंदिवस चितात लागली आसे. याप्रतीच सर्वांचे विचारस येऊन स्वराज्य रक्षावे हर दौलतदाराचा प्रसार होऊ देऊ नये हे चांगले आहे."[५]

१८०३ मध्ये लिहिलेल्या दुसऱ्या एका पत्रात रघुजीने यशवंतरावांना लिहिले " येस्या प्रसंगास तुमचे येणे व्हावे स्वराज्य रक्षावे हिंदू धर्म राहावा हे सर्वपरी चांगले व सल्हह आहे याउपरी दिवसगत लागू नयेत म्हणून हिंदू धर्माची आस चितात पुरती असावी हे प्रकार तुमचे कडील कारभारी यासी बोलण्यात आणिलेच आहेत."[६]

सरदेसाई त्यावेळच्या मराठा मंडळाची एकजूट करण्याच्या प्रयत्नांविषयी लिहितात. "गेल्या दोन महिन्यात शिंदे, भोसले, होळकर इत्यादिकांचे वकील उघडपणे एकमेकांकडे जाऊन इंग्रजांविरुद्ध मराठा मंडळाची जंगी जूट उभी करण्याचा उघड प्रयत्न करीत होते." या हालचालींची माहिती इंग्रजांना होती असे त्यांनी नमूद केले आहे ते म्हणतात " कॉलीन्स याने नागपूरकर भोसलेंचा प्रतिनिधी श्रीधर पंत याला म्हटले होते की, तुम्ही शिंदे व भोसले युद्धाची तयारी जोराने करीत आहात होळकरास सामील करून घेऊन इंग्रजांविरुद्ध मराठ्यांची जूट जमविण्याचा तुमचा उद्योग चालू आहे."[७]

असे असले तरी इंग्रजांनी यावेळी त्यांच्या विरुद्ध संघ निर्माण करण्याच्या यशवंतरावांसह मराठा सरदाराच्या हालचाली रोकण्याचा प्रयत्न केला नाही. कदाचित ते त्याकरिता योग्य संधीची वाट पाहत असावेत. दरम्यानच्या काळात यशवंतरावांनी शिंदे भोसल्यांशी करावयाच्या समेटाच्या अटी निश्चित करून त्या भोसल्यांचे वकीलामार्फत दौलतराव शिंदेकडे पाठविल्या. या अटींच्या प्रत्युत्तरात दौलतरावाने इंग्रजांविरुद्ध संयुक्तरित्या युद्ध करण्याची तयारी दर्शविली व काही सूचनाही दिल्या. बोदवळ येथे दौलतराव व रघुजी भोसले यांची भेट झाली. याविषयी सरदेसाई लिहितात " रघुजीने बोदवळ येथे सिंद्यांची भेट घेऊन पहिले बोलणे होळकरांची समजूत काढण्या संबंधीचे केले. त्यानुसार समेट ठरवून तशी पत्रे रघुजीने यशवंतरावांस पाठविले."[८]

वरील वाटाघाटीचा परिणाम म्हणून दौलतराव शिंदे याने खंडेराव होळकर याला यशवंतराव होळकरांच्या हवाली केले. सरदेसाई यांनी नमूद केल्याप्रमाणे ७ ऑगस्ट १८०३ पर्यंत यशवंतराव होळकरांच्या मागण्या दौलतरावाने पूर्ण केल्या नव्हत्या. हे २३ ऑगस्ट १८०३ रोजी यशवंतरावांनी रघुजी भोसले यांना लिहिलेल्या पत्रावरून दिसून येते. ते पुढे म्हणाले " भोसल्यांनी दौलतरावास कितीही आग्रह केला तरी, होळकराचा नाश करण्याची अटी त्याने (दौलतरावाने) सोडली नव्हती. ही अट न सोडण्याचे कारण बाजीराव अंतस्थरीतीने यशवंतरावाचा सूड घेण्यास दौलतरावास प्रोत्साहन देत होता हे होते."[९]

ते पुढे लिहितात "इंग्रजांच्या भयामूळे नागपूरकर भोसल्यांच्या मध्यस्थीने दौलतराव शिंद्यांनी उत्तर हिंदुस्थानातील होळकरांचा प्रदेश परत करण्याचे वचन दिले असले तरी यामागे दौलतरावाचा उद्देश खरोखरच यशवंतरावांशी समेट करण्याचा नव्हता. तर यशवंतरावांच्या मदतीने आलेल्या संकटाचे निवारण करण्याचा होता."[१०]

तर वा. वा. खरे लिहितात "यशवंतरावांशी समेट करण्यास बाजीरावाचा विरोध होताच तसेच शिंद्यांच्या दरबारातील काही मंडळी कोणत्याही परिस्थितीत यशवंतरावांशी समेट करण्यास तयार नव्हती. समेट होऊ नये यासाठी त्यांनी दौलतरावावर दडपणही आणले होते."[११]

२७ ऑगस्ट १८०३ रोजी यशवंतरावांनी राघुजीस पत्र लिहून इंग्रजांविरुद्ध हिंदुस्थानातील इतर सरदार व सत्ताधीशांना एकत्र आणण्याविषयी कळवीले त्याने लिहिले की, ' आपली त्रिवर्गाची एकदिली जाली तेव्हा स्वराज्यातील सर्व लहान थोर सरदार, मराठे, मुसलमान, सामील होतील. हिंदुस्थान प्रांतीचे राजेरजवाडे व समशेर बहाद्दर, बुंदेले, झाशीवाले, आदिकरून छोटे मोठे अनुकूल होतील, इतका भरणा पाहतां पांच सहा लाख फौज व १० कंपू होतील दोन थाके (भाग) करून चाल केली असता काही जड पडावे असे नाही. त्यांची चाल चहूंकडून, आणि आपण एके ठिकाणीच घोटाळणे ठीक नाही. फौज व कंपू तिकडील जिल्ह्यातील बोलावून घेऊन त्यांची आपली छोटी लांब पल्ल्याची राखून, पथम नबाबाचा मुलुख पोटी पाडावा. इकडे आम्हीही तसा बेत धरितो. त्रिवर्गाची ऐकी जाहली त्याअर्थी पाहून ते करू आपण इकडील कोणेविशी संशय मनांत न आणिता सर्व प्रकारे मसलतीस अनुकूल आहो हे खातरजमा ठेऊन तिकडे मसलतीचा नक्ष येईल तसा इकडे कळवीत जावा. इकडे घडेल तसे आपल्यास लिहित जाऊ. सारांश या प्रसंगी एकदिलीत कसर नसावी. याचे पोटांत कामे बहुत आहेत आपण विचारवंत दूरदृष्टी आहा. विस्तारे लिहावे असे नाही. पत्राच्या रवानग्या वरचेवर होत जाव्या.'[१२]

अशाप्रकारे इंग्रजांविरुद्ध संयुक्त आघाडी निर्माण करून त्यांचा प्रतिकार करण्याच्या दृष्टीने यशवंतरावांशी नागपूरकर भोसलेंच्या माध्यमातून वाटाघाटी केल्या असल्या तरी, तिन्ही सरदारांमध्ये परस्पर विश्वासाचा अभाव असल्याचे ही दिसून येते. बाजीराव पेशव्याच्या दडपणामुळे तसेच जुन्या वैमनस्यामुळे दौलतराव शिंदेंची यशवंतरावांशी सख्य करण्याची मानसिक तयारी होत नव्हती. या. मा. काळे यांनी म्हटल्याप्रमाणे " पत्रोपत्री उलट भोसल्यासच ब्रम्हज्ञान सांगण्यास यशवंतराव कमी करीत नव्हते. ते अघडपघड रीतीने उपदेश भोसल्यास व शिंद्यास करतच होता."[१३]

अशा स्थितीत दौलतराव शिंदेने " देखावा म्हणून यशवंतरावांशी मैत्री केल्याचा व युद्धानंतर त्याचाही बंदोबस्त करण्याचा इरादा बाजीरावाला लिहिलेल्या पत्रात नमूद केला होता. सदर पत्र अमृतरावाने हस्तगत करून ते जनरल वेलस्ली याला दिले व त्याने ते पत्र यशवंतरावांना दिले या पत्राचा परिणाम म्हणून यशवंतराव इंग्रजांविरुद्धच्या संयुक्त आघाडीतून बाहेर पडला व त्यांनी इंग्रजांविरुद्धच्या युद्धात सामील न होण्याचा निर्णय केला.[१४] तो माळव्याला जाऊन राहिला.[१५]

अशाप्रकारे दुसरे इंग्रज मराठा युद्धात यशवंतराव सामील झाले नाही या युद्धात तटस्थ राहण्यामागे यशवंतरावांचा वयक्तिक स्वार्थ व ब्रिटीशांची कुटनीतीही कारणीभूत ठरल्याचे दिसून येते. २३ जून १८०२ रोजी वेलस्लीने कर्नल क्लोजला लिहिले होते की, " होळकराचा उद्देश त्याच्या (होळकराच्या) प्रदेशावर अधिकार करण्याचा दिसतो. शिंदे व आपल्यात (इंग्रजात) होणाऱ्या युध्दाद्वारे तो आपला उद्देश साध्य करू पाहत आहे....."[१६] पण सरदेसाई असेही म्हणतात की "सुरु झालेल्या युद्धाच्या परिणामांची होळकर वाट पाहत होता. योग्य वेळी त्यात सामील होण्याचा त्याचा विचार होता."[१७] तर वा. वा. खरे लिहितात... "शिंद्याचा जय झाला तर आपला सरंजाम आणि आपला जीव याच्या अस्तित्वासाठी आपणास शिंद्यांशी लढावे लागेल असे होळकराला वाटत होते"[१८] ग्रांट डफ यांनीही खरे यांच्या सारखेच विधान केले आहे.[१९]

त्याचप्रमाणे यशवंतरावांप्रतीचे इंग्रजांचे मवाळ व त्याचेशी संघर्ष टाळण्याचे इंग्रजांचे धोरणही दुसऱ्या इंग्रज मराठा युद्धात यशवंतरावांनी तटस्थ राहण्याचा निर्णय घेण्यासाठी साह्यभूत ठरले होते यशवंतराव इंग्रजांच्या विरोधात संघ निर्माण करून युद्धाची तयारी करीत असल्याची जाणीव असूनही इंग्रजांनी त्याला उलट विरोध करण्याचे टाळले. तसेच यशवंतरावांच्या कारवायांकडे हेतुपुरस्पर किंवा जाणून बुजून दुर्लक्ष केले यामागे इंग्रजांचा उद्देश शिंदे व भोसले यांच्या विरुद्धच्या संघर्षात सामील होण्याचे निमित्त यशवंतरावांना मिळू नये असा असावा. कारण यशवंतरावांकडे रणकौशल्य व

आधुनिक सैन्य होते. त्यामुळे तो सामील झाल्यास इंग्रजांना विजय प्राप्त करणे अवघड गेले असते. " यशवंतरावांच्या तटस्थतेमुळे आपण शिंदे व भोसले यांचा पराभव करू शकलो असे वेलस्लीने बोर्ड ऑफ कंट्रोलचा अध्यक्ष डन्डास याला लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे. कर्नल लेक यानेही अशीच कबुली दिली आहे"[२०]

मात्र शिंदे व भोसले विरुद्धच्या युद्धात यशवंतराव होळकर तटस्थ राहिल्यामुळे इंग्रजांना शिंदे व भोसलेंचा पराभव करणे सहज शक्य झाले. देवगावचा तह करून भोसल्यांनी तर सुर्जी अंजनगावचा तह करून शिंद्यांनी इंग्रजांविरुद्धचा संघर्ष थांबविला. यांनतर इंग्रज आपल्याकडे वळतील याची जाणीव यशवंतराव होळकरांना युद्धाच्या प्रारंभापासूनच झाली होती. इंग्रजांशी संभाव्य संघर्ष करण्याकरिता यशवंतरावांनी युद्धसज्जता सुरु केलीच पण त्याच बरोबर पुन्हा शिंदे व भोसलेंची आघाडी निर्माण करण्याचेही प्रयत्न चालविल्याचे २१ जानेवारी १८०४ रोजी यशवंतरावांनी त्याचा नागपूरचा वकील खंडो महादेव याला पाठविलेल्या पत्रावरून दिसून येते. या पत्रात ते लिहितात. " तुमची रवानगी रघुजी भोसले व दौलतराव याजकडे केली, त्यावर तुमची पत्रे आली....येथे मसलतीचा प्रसंग, येथील एक संधान राहून शत्रूचे पारिपत्य होऊन बंदोबस्त झाला पाहिजे. या अन्वये तुम्हीही बोलून ज्यात त्यांची कायमी पूर्वीप्रमाणे राहून मसलत शेवटास जाऊन स्वराज्याचा बंदोबस्त घडून हिंदू धर्म राहील ते करणे... आम्ही अजमिरची सुमारास जाऊन जोधपुरकरांचे संधान पक्के केले आहे... कोणी काही लिहितील व बोलतील त्याचे संशय मनात येऊ न देता, कायमी राहून ज्यात एकदिलीने मसलत शेवटास मारून बंदोबस्त घडे ते करणे."[२१]

सरदेसाई यांनी नमूद केले आहे की, एप्रिल १८०४ मध्ये यशवंतरावांनी आपले वकील बुऱ्हाणपुरास शिंद्यांकडे पाठवून विनंती केली की इंग्रजांचा पाडाव करण्यासाठी तुम्ही आम्हास सामील व्हावे. ५ मार्च १८०४ रोजी ते वकील शिंद्यांकडे आले पण एकवार युद्धात हात चांगलेच पोळल्यामुळे पुन्हा त्यात पडण्याची शिंद्यास बिलकुल इच्छा नव्हती.....दौलतरावाने आपला वकील यशवंतरावांकडे पाठविला ३ मार्च १८०४ रोजी हा वकील होळकरांकडे आला. यशवंतरावांनी त्या वकिलाची गुप्तपणे भेट घेऊन कळविले की शिंद्यांचे यत्किचीत अहित करण्याचा माझा इरादा नाही इंग्रजांस नर्म करावे एवढाच माझा हेतू आहे इंग्रजांनी मराठ्यांचे राज्य बुडविले त्याचा प्रतिकार करणे हेच आज अत्यंत निकडीचे माझे काम असून त्यासाठी तुमचे अजमेरचे ठाणे मला तात्पुरते ताब्यात घेणे जरूर वाटले ते स्थळ जोधपुरकरास देऊन त्याची मदत मी मिळवली आहे."[२२]

अशाप्रकारे यशवंतराव होळकर या ना त्या प्रकारे दौलतराव शिंदेंचे मन वळवून त्याला इंग्रजांविरुद्धच्या युद्धात पुन्हा सामील करून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करू लागला याविषयी सरदेसाई लिहितात " इंग्रजांविरुद्धच्या युद्धात हात चांगले पोळून निघाल्यामुळे पुन्हा त्या भानगडीत पडू नये अशी त्याची (दौलतरावची) मनोदेवता त्यास (दौलतरावास) शिकवीत होती. उलट यशवंतराव होळकरांचा त्याजकडे एकसारखा लकडा चालूच होता की, झाले ते विसरून तुम्ही एकदम कंबर बांधून मला सामील व्हा. तुम्ही, मी व भोसले एक झाल्यावर इंग्रजांची बिशाद काय? त्यांना तत्काल उखडून देऊन आपण मराठेशाहीचा पुन्हा उद्धार करू...."[२३]

यशवंतराव होळकरांनी केवळ शिंदे, भोसले व इतर मराठा सरदारांनाच इंग्रजांविरुद्ध एकत्र आणण्याचा प्रयत्न केले नाही तर हिंदुस्थानमधील इतर सत्ताधीशांचीही मदत प्राप्त करून प्रबळ संघ निर्माण करण्यास सुरुवात केली पंजाबच्या रणजीतसिंगालाही ब्रिटिशांविरुद्ध संयुक्तरीतीने संघर्ष करण्यास राजी केले. याकरिता शीख धर्म स्वीकारण्याची हमीही यशवंतरावांनी दिल्याचे उल्लेख सापडतात. इतकेच नव्हे तर रणजीत सिंहाने मदत न केल्यास मुस्लीम शासकांची मदत प्राप्त करण्याकरिता 'इस्लाम धर्म' स्वीकारणार असल्याचे घोषित केले.[२४] तसेच आपल्या कार्याला राजमान्यता प्राप्त व्हावी म्हणून दिल्लीच्या बादशाहकडून 'महाराजाधिराज राजराजेश्वर अलिजाबहादूर' अशी पदवी प्राप्त करून घेतली.[२५]

याव्यतिरिक्त जयपूर, जोधपुर, माचेडी, गोहद येथील राजपूत राजे तसेच बुंदेलखंड जाठवाड, आहेरवाडा येथील संस्थानिकांशीच नव्हे तर नेपाळच्या महाराजांशी तसेच अफगाणिस्तानच्या शहाशी मैत्री प्रस्थापित करून इंग्रजांविरुद्ध प्रबळ संघ निर्माण केला.[२६]

सरदेसाई यांनी म्हटल्याप्रमाणे " यशवंतराव होळकरांच्या इंग्रजांविरुद्ध संघ निर्माण करण्याच्या प्रयत्नांना जस - जसे यश प्राप्त होत गेले, तस - तसे हिंदी सत्ताधीशांच्या मनाची चलबिचल वाढत गेली. नागपूरचे दरबारी रघुजी भोसले यांचे मनातही इंग्रजांविरुद्ध उठाव करण्याचे आले. ते हुशंगाबाद काबीज करण्या करिता सैन्यासह नर्मदेवर आले इतकेच नव्हे तर ज्या सर्जेराव घाटगे यांनी सातत्याने यशवंतराव होळकराचा विरोध केला होता व दौलतराव शिंद्याचे समर्थन केले होते, त्याने दौलतराव शिंदेकडे जाऊन सातत्याने होळकरांशी मिळून इंग्रजांना नमविण्याचा आग्रह धरू लागला[२७] यावेळी यशवंतरावांचा इंग्रजांविरुद्ध सुरु असलेल्या संघर्षात रणजीतसिंह जाठ सामील झाला होता मात्र इंग्रजांनी कपट विद्येचा प्रयोग करून रणजीतसिंहाला युद्ध बंद करून १० एप्रिल १८०५ रोजी तह करण्यास राजी केले. यामुळे यशवंतरावांना एकट्याच्या बळावर इंग्रजांचा सामना करावा लागला.[२८]

रणजीतसिंह जाटांनी इंग्रजांशी तह करून त्यांच्या विरुद्धचा संघर्ष थांबविला असला तरी यशवंतराव होळकर एप्रिल १८०५ मध्ये दौलतराव शिंदेच्या भेटी करिता संबळगड येथे आला याचवेळी सातारकर, चतरसिंग भोसले व अनेक मराठी सरदार विचार विनिमय करण्यासाठी शिंदेच्या छावणीत जमले होते. या सर्वांचा विचार इंग्रजांना हिंदुस्थान मधून हाकलून लावण्याचा होता. मात्र दौलतराव शिंदेचा विचार इंग्रजांशी समेट घडून आणण्याचा होता असे सरदेसाई यांनी नमूद केले आहे. १५ एप्रिल १८०५ रोजी दौलतरावाने इंग्रज रेसिडेंट याला जे पत्र पाठविले त्या पत्रातील मजकुरावरून सरदेसाई यांनी दौलतरावाबाबत सदर विधान केले आहे. १० मे १८०५ रोजी शिंदे - होळकर कोट्यावरून अजमेरकडे गेले. याच भेटीत दौलतरावाने काशीराव होळकराला यशवंतरावांकडे आणून त्यांच्यातील कटुता कमी करण्याचा प्रयत्न केला[२९]

पण यशवंतराव होळकर व दौलतराव शिंदे यांचे सहकार्य फार काळ टिकले नाही २२ नोव्हेंबर १८०५ रोजी शिंदे व इंग्रज यांच्यात मुस्ताफापूरच तह झाला त्या तहानंतर शिंद्यांनी इंग्रजांविरुद्धचा संघर्ष थांबविला तरीही यशवंतरावांनी एकट्याच्या बळावर इंग्रजांविरुद्धचा संघर्ष सुरूच ठेवला पण शेवटी २४ डिसेंबर १८०५ राजपूरघाटचा तह करून इंग्रजांविरुद्धचा लढा थांबविला.[३०]

इंग्रजांविरुद्धचा संघर्ष थांबवून राजपूरघाटाचा तह करण्यामागील कारणांची तसेच तोपर्यंत यशवंतरावांनी ब्रिटिशांविरुद्ध संघ निर्माण करण्याकरिता केलेल्या प्रयत्नांची माहिती १५ फेब्रुवारी १८०६ ला यशवंतरावांनी व्यंकोजी भोसलेला पत्र लिहून कळविली

तसेच यशवंतराव होळकरांनी इंग्रजांशी राजपूरघाटचा तह करून तडजोड केली असली तरी इंग्रजांविरुद्ध संघ निर्माण करून युद्ध करण्याचा मानस सोडला नव्हता. यानंतरही त्यांनी दौलतराव शिंदेशी मिळून इंग्रजांविरुद्ध संघ निर्माण करण्याचे प्रयत्न चालविले. तशा आशयाचे पत्र दौलतरावाला पाठविले. १४ नोव्हेंबर १८०७ ला दौलतरावानेही इंग्रजांविरुद्ध संघर्ष करण्याची व्युह रचना करण्या करिता ११ मुद्दे मान्य केले. मात्र यशवंतरावांच्या या हालचालींची माहिती खुद्द दौलतरावाने इंग्रजांना दिली. इंग्रजांनी शिंदेंना होळकरापासून दूर केले त्यांनंतर मात्र यशवंतरावांनी स्वत: च्या बळावर इंग्रजांविरुद्ध संघर्ष करण्याचा निर्णय केला. २७ ऑक्टोबर १८११ पर्यंत अर्थात यशवंतरावांच्या मृत्यूपर्यंत त्यांनी एकट्याच्या बळावरच इंग्रजांशी संघर्ष केला.

## निष्कर्ष :

अशाप्रकारे वसईच्या तहामुळे इंग्रजांपासून निर्माण झालेल्या धोक्याची जाणीव यशवंतराव होळकर यांच्यासह दौलतराव शिंदे व नागपूरकर भोसले यांनाही झाली. राज्य संपले तर आपली सत्ताही जाईल.याचीही जाणीव त्यंना होती. त्यामुळे एकत्रित येऊन राज्य वाचविण्यासाठी संयुक्त संघ निर्माण करणे हितावह असल्याचेही त्यांना समजले यासाठी यशवंतराव होळकरांनी पुढाकार घेतला. केवळ शिंदे व भोसले यांनाच नव्हे तर हिंदुस्थानातील इतर राजे संस्थानिकांनाही एकत्र आणून बलाढ्य संघ निर्माण करावा व त्या माध्यमातून हिंदुस्थानातून ब्रिटीश सत्ता हद्दपार करावी असा यशवंतरावांचा उद्देश होता.

तो साध्य करण्यासाठी त्यांनी दौलतराव शिंदे, नागपूरकर भोसले, रणजितसिंह जाठ व इतर राजे व संस्थानिकांना एकत्र आणण्याच्या दृष्टीने पावले उचललीत. त्या प्रयत्नांना यशही येऊ लागले. पण यशवंतरावांनी दुसऱ्या

**इंग्रज-मराठा युद्धात तटस्थ राहणे, प्रदेश व पैसा परत करण्याची अट ठेऊन दौलतरावांशी समेटाचे बोलणे करणे. जुन्या व वैमनस्याला मूठमाती देण्याची तयारी नसणे. मुख्य म्हणजे लष्करी सामर्थ्य वाढीबरोबरच कुटनीतीचा यशस्वी वापर करून इंग्रजांना मात न देऊ शकणे, उलट इंग्रजांच्या कुट व कपटनीतीला यश प्राप्त होणे हे इंग्रजांविरुद्धचा प्रबळ संघ टिकू न शकण्याकरिता कारणीभूत ठरले. एकंदरीत या. मा. काळे यांनी म्हटल्याप्रमाणे " प्रत्येक जण खरोखरीच इंग्रजांचा द्वेष करीत होता. व सर्वजन मिळून इंग्रजांच्या कचाट्यातून सुटून मराठी साम्राज्याची घडी पुन्हा बसवावी ही सर्वांची प्रामाणिक इच्छा होती. पण या इच्छेस लागणारी खटपट व स्वार्थ त्याग करण्यास कोणीच तयार नव्हता. या व इतर कारणांनी हा योग सिद्धीस गेला नाही."[३१] हेच दर्शविण्यासाठी व त्यापासून बोध घ्यावा यासाठी सदर शोध निबंध प्रस्तुत केला आहे.**

**तळटीपा :**

**१ सरदेसाई गोविंद सखाराम - मराठों का नवीन इतिहास भाग ३, शिवलाल अग्रवाल एण्ड कंपनी , आग्रा, पृ. ३९७**

**२ कानुनगो- जसवंतराव होळकर द गोल्डन रोग १९६५ पृ. १४३**

**३ काळे या. मा. - नागपूरकर भोसल्यांचा इतिहास, विदर्भ संशोधन मंडळ, १९८९ पृ. २१६**

**४ कानुनगो - जसवंतराव होळकर पृ. १४३**

**५ डॉ. श. गो. कोलारकर, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर - रघुजी भोसले दुसरे यांची पत्रे पत्र क्र.५९. पृ. २९**

**६ कित्ता - पत्र. क्र. ६५. पृ. २९**

**७ सरदेसाई गो. स. - मराठी रियासत, खंड ८, - पाप्युलर प्रकाशन, मुंबई १९३२ पृ. २५२, २५७.**

**८ कित्ता - पृ. २६४**

**९ सरदेसाई गो. स. - मराठी रियासत, खंड ८, पृ. २६७**

**१० सरदेसाई गो. स. - मराठों का नवीन इतिहास भाग ३, पृ. ४१६**

**११ खरे वा. वा. - ऐतिहासिक लेख संग्रह, खंड १४, पत्र क्र. ६६६२ पृ. ७६६०, ७६६१.**

**१२ सरदेसाई गो. स. - मराठी रियासत, खंड ८, पृ. २६७, २६८.**

**१३ काळे या. मा. - नागपूरकर भोसल्यांचा इतिहास, विदर्भ संशोधन मंडळ, १९८९ पृ. २१८**

**१४ कानुनगो - पृ. १६३.**

**१५ अहिल्या स्मारिका - देवी अहिल्याबाई ट्रस्ट इंदोर - १९७६ पृ. २१.**

**१६ सरदेसाई गो. स. - मराठों का नवीन इतिहास भाग ३, पृ. ४१७**

**१७ कित्ता - पृ. ४१८**

**१८ खरे वा. वा. - ऐतिहासिक लेख संग्रह, खंड १४, पृ. ७६८४.**

**१९ कानुनगो - पृ. १६१**

**२० कित्ता - पृ. १६७**

**२१ सरदेसाई गो. स. - मराठी रियासत, खंड ८, पृ. ३१८**

**२२ कित्ता - पृ. ३२०, ३२१**

**२३ कित्ता - पृ. ३४६**

**२४ अहिल्या स्मारिका - पृ. ३५, ३६**

**२५ खरे वा. वा. - ऐतिहासिक लेख संग्रह, खंड १४, पृ. ७८५०**

**२६** R. C. Majumdar and A. B. Pusalker, The History and Culture of the Indian People, Bombay Bhartiya Vidya Bhavan 1951

**२७ सरदेसाई गो. स. - मराठी रियासत, खंड ८, पृ. ३५३, ३५४.**

**२८ कित्ता - पृ. ३४४**

**२९** James Mill – The History of British India. Vol 3, page 685

३० छाबडा जी. एस. - आधुनिक भारतीय इतिहास एक प्रगत अध्ययन, १९८४, स्टर्लिंग पब्लिशर्स नई दिल्ली पृ. ४०३
३१ काळे या. मा. - नागपूरकर भोसल्यांचा इतिहास, विदर्भ संशोधन मंडळ, १९८९ पृ. २४७